# ओएनजीसी (डब्ल्यूओ) कर्मचारी संघटना

मान्यताप्राप्त युनियन

कर्मचारी / अधिकारी बंधू भगिनींनो,

ओएनजीसी एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट अँड थ्रीफ्ट सोसायटी लि. ही संस्था स्वायत्त असून मुंबई विभागात सन १९८४ पासून कार्यरत आहे. आता तर या सोसायटीचे कार्यक्षेत्र मुंबईबाहेर हाजीरा पर्यंत विस्तारले आहे. या सोसायटीच्या फेब्रुवारी २०१८ मध्ये झालेल्या कार्यकारीणी सभेत सभासदांना टायटन या नामांकीत कंपनीचे घड्याळ देण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे त्या महिन्यात टायटन कंपनीला घड्याळांची ऑर्डर देण्यात आली. आज सोसायटीच्या सर्व सभासदांना या घड्याळांचे वाटप होत आहे हे आपणा सर्वांना माहित आहेच.

आपल्या आशिर्वादामुळेच ओएनजीसी एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट अँड थ्रीफ्ट सोसायटी लि. च्या संचालक मंडळावर निरपेक्ष वृत्तीने काम करणारे सभासद निवडून येतात. व आपल्या विश्वासाला कोठेही तडा न देता या सोसायटीची आर्थिक भरभराट विश्वस्त म्हणून प्रामाणिकपणे करीत असतात.

मान्यताप्राप्तीसाठी होणारी निवडणूक व सोसायटीची भेट वाटप हा निव्वळ योगायोग आहे, कारण फेब्रुवारी २०१८ मध्ये सदर निवडणूक जूनमध्येच होणार हे आम्हालाच काय पण आमच्या विरोधकांना सुध्दा माहित नव्हते. कारण ह्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केंद्रीय श्रम आयुक्त करतात हे आपल्या सर्वांना माहित आहे. त्यामुळे युनियनची निवडणूक आहे म्हणून सोसायटी मौल्यवान वस्तूंचे वाटप करीत आहे हा विरोधकांचा आरोप बिनबुडाचा व वस्तूस्थितीचे विपर्यास करणारा आहे.

आमचे या विरोधकांना सांगणे आहे कि, निवडणूकीला तुम्हीसुध्दा सामोरे जात आहात. व तुमच्याकडेही तुमच्या अधिपत्याखाली असणारी ३५ वर्षे जूनी, सागर सम्राट पतसंस्था कार्यरत आहे. जमत असेल तर तुम्हीसुध्दा आमच्यापेक्षाही चांगली व मौल्यवान भेटवस्तू आपल्या सभासदांना द्या. त्यासाठी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम ठेवायला हवी. व त्याहीपेक्षा ती संस्था निरपेक्षपणे चालवायला हवी.

युनियनच्या निवडणूका व या संस्था यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. पण सुसाट, खोटे व बेफाम आरोप करायचे, मतदारांना गोंधळवून टाकायचे, त्यांना संभ्रमीत करायचे व मत घ्यायची अशी वेगळीच रणनिती विरोधकांनी आखलेली आहे. त्यामुळे सत्यस्थितीचा खुलासा करण्यासाठी हे पत्रक आहे.

कामगार बांधवांना मुर्ख बनवून निवडणका जिंकता येतात असा विरोधकांचा ठाम विश्वास असेल तर हि कामगारफसव्या वृत्तीचा वेळीच बंदोबस्त करणे हि काळाची गरज आहे. म्हणूनच भूलथापांना व फसव्या प्रचाराला बळी न पडता येणाऱ्या निवडणूकीत कर्मचारी संघटनेला भरघोस मतांनी विजयी करा. प्रामाणिक प्रयत्नांना प्रामाणिक साथ द्या. हि विनंती.

**कामगार एकता झिंदाबाद ! कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

दि. ९/६/२०१८ **प्रदीप मयेकर (सरचिटणीस)**



**हेलिकॉप्टर निशाणीवर शिक्का मारुन कर्मचारी संघटनेस विजयी करा.**